(CNRMHSN110010342022)

**<u>संक्षिप्त फौजदारी खटला क्र.४३५/२०२२ निशाणी १६ लगत सरतपास</u>**

१४.    फिर्यादीने आपल्या सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रात पुराव्यात कागद दाखल करण्याबाबतचे कथन केलेले आहे. आरोपीचे वकील हजर आहेत. युक्तीवाद ऐकला.

सबब खालील आदेश करण्यात येतो –

१५.    या कामी निशाणी ३/१ कडे फिर्यादीने धनादेश क्र.०७०३०२ सादर केलेला आहे. त्या धनादेशावरील आरोपीची सही त्याने ओळखली आहे व तो त्यांना दिला असल्याचे सांगितले आहे. **(सदर धनादेशाला परक्राम्य दस्ताऐवज अधिनियम १८८१ चे कलम ११८ व १३९ अन्वये गृहीतक असल्यामुळे त्याला निशाणी क्र.१९ देण्यात येते.)** निशाणी ३/२ कडे धनादेश अनादरीत झाल्याबाबत सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक या बँकेचा मेमो सादर केला आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. **(सदर मेमोला परक्राम्य दस्ताऐवज अधिनियमचे कलम १४६ अन्वये गृहीतक असल्यामुळे त्याला निशाणी क्र.२० देण्यात येते.)**

१६.    निशाणी ३/३ येथे आरोपीस नोटीस पोस्टाने पाठविलेबाबत पोस्टाची पावती दाखल केली आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. **(सदर पावतीस निशाणी क्र.२१ देण्यात येते.)** निशाणी ३/४ आरोपीस पाठवलेल्या वकीलांमार्फत पाठवलेली नोटीसची प्रत दाखल केली आहे. त्यावरील सही फिर्यादीने ओळखलेली आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. **(सदर नोटीशीस निशाणी क्र.२२ देण्यात येते.)** निशाणी ३/५ कडे आरोपीने नोटीस स्वीकारलेबाबतची रजिस्टर पोस्टाची पोहोच पावती दाखल केलेली आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. **(पोहोच पावतीस निशाणी**

**क्र.२३ देण्यात येत आहे.)**

**<u>आरोपीच्या वकीलांच्या तोंडी विनंती वरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब</u>**

ASHWINI JOTIRAM BACHULKAR

Digitally signed by ASHWINI JOTIRAM BACHULKAR
Date: 2024.11.05 17:03:39 +0530

आटपाडी. (अ. जो. बाचुळकर)

दिनांक : ०५/११/२०२४ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,

आटपाडी